माहितीचा
अधिकार

दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/१३४/२०१८
दि.२०/१०/२०१८.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.

श्री.ॲन्थोनी एलेझार मिनेझीस, ...............अपिलार्थी
शांती गार्डन बिल्डींग नं.५/२०३,
सेक्टर नं.३, मिरारोड (पूर्व),
ता.जि.ठाणे ४०११०७.

जनमाहिती अधिकारी तथा, ...............प्रतिवाद
प्र.कर निरिक्षक, प्रभाग क्र.६

## -: विवेचन :-

श्री.ॲन्थोनी एलेझार मिनेझीस यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा प्र.कर निरिक्षक, प्रभाग क्र.६ यांचेकडे दि.२०/०८/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१) मालमत्ता क्र.एल०४००३६००२००० याची कर आकारणी कोणत्या सालापासून लावण्यात आलेली आहे. याची मला आवश्यकता असल्यामुळे आपण लेखी स्वरुपात माहिती द्यावी.
२) सदर मालमत्ता क्र.एल०१००३५८९१००० याची कर आकारणी कोणत्या सालापासून लावण्यात आलेली आहे. याची माहिती लेखी स्वरुपात द्यावी.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**
माहिती अधिकार अंतर्गत दि.२०/०८/२०१८ रोजीच्या पत्रान्वये माहिती दिली नसल्याने अपिलार्थी अर्जदार यांनी दि.०३/१०/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (कर) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**
अपिलार्थी अर्जदार व जनमाहिती अधिकारी तथा प्र.कर निरिक्षक, प्रभाग क्र.६ यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.२०/१०/२०१८ रोजी दुपारी ०३.१० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/ उपआ.कर/३७९/२०१८ दि.११/१०/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा प्र.कर निरिक्षक, प्रभाग क्र.६ हे व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- माहिती अधिकार अंतर्गत मला माहिती दिली नाही.
२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

-: **निर्णय** :-

१) जनमाहिती अधिकारी तथा कर निरिक्षक, प्रभाग क्र.६ यांनी अपिलार्थी अर्जदारास १० दिवसांत विनाशुल्क मुद्देनिहाय माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (कर)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति:-

१) श्री.ॲन्थोनी एलेझार मिनेझीस,
शांती गार्डन बिल्डींग नं.५/२०३,
सेक्टर नं.३, मिरारोड (पूर्व),
ता.जि.ठाणे ४०११०७.

२) जन माहिती अधिकारी तथा
प्र.कर निरिक्षक, प्रभाग क्र.६

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (कर) यांचे कार्यालय.